MHPU240003972021

## रे.मु.नं.७६/२०२१ मधील निशाणी क्र.१९ खालील आदेश

१. प्रतिवादी क्र. ४ यांनी प्रस्तूतचा अर्ज कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जातील प्रतिवादी क्र. ४ यांचे कथनानुसार, ते जेष्ठ नागरिक असून सतत आजारी असल्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत व जबाब दाखल करता आली नाही. त्यामुळे कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. झालेला विलंब माफ केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजुर झाल्यास प्रतिवादींवर अन्याय होणार आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वानुसार अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. प्रस्तूतच्या अर्जावर वादीने त्यांचे म्हणणे देवून प्रतिवादी क्र. ४ यांना कैफियत व जबाब देण्यास उशीर झालेला असून जास्तीत जास्त दंड आकारुन अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

४. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तूतचा दावा हा मालकी हक्काने ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र. ४ यांना दाव्याचे समन्सची बजावणी होवून ते वकीलांमार्फत दि. १६.०७.२०२१ रोजी दाव्याच्या कामी हजर झालेले आहेत. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र. ४ यांना दाव्याच्या कामी कैफियत दाखल करण्यास ३० दिवसांपेक्षा जास्त विलंब झालेला दिसून येतो. प्रतिवादी क्र. ४ यांनी सदरचा अर्ज दि.२२.११.२०२१ रोजी दाखल केलेला असून

अर्जात नमूद केलेले कारण कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत नाही. परंतु, प्रतिवादी क्र. ४ यांची कैफियत दाव्याच्या कामी सामील करून न घेतल्यास दाव्यातील गुंतागुंत निश्चितच वाढणार आहे व दावा सर्व बाजूंचा न्यायीक विचार करून निर्गत करणे अडचणीचे होणार आहे. याउलट, प्रतिवादी क्र. ४ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास दाव्यातील वादाचे निश्चित स्वरूप न्यायालयासमोर येवून दाव्यातील वाद निर्गत करण्यास मदत होणार आहे. तसेच वादींनी प्रस्तुतच्या अर्जास कोणतीही हरकत घेतल्याचे दिसून येत नाही. शिवाय प्रस्तुत दावा हा मालकी हक्काने ताबा मिळण्याचा असल्याने प्रतिवादी नं. ४ यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणेस नैसर्गिक न्यायतत्वानुसार गरजेचे असल्याने प्रतिवादी क्र. ४ यांचा प्रस्तुत अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी क्र. ४ यांना आपले म्हणणे/कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत योग्य तो दंड आकारून अर्ज निर्गत करणे आवश्यक असल्याचे निर्णयाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**—: <u>आदेश</u> :—**

१. प्रतिवादी क्र. ४ यांचा अर्ज नि. १९ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं. ४ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब रक्कम रू. ३००/— चा दंड वादीला देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो. प्रतिवादी नं. ४ यांनी दिलेली कैफियत, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्यानंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

Digitally signed by MEGHA SHANKARRAO MALI
Date: 2022.10.15 17:59:26 +0530

घोडेगाव
दिनांक — १५.१०.२०२२

(एम. एस. माळी)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव